श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## .मासिक.

वर्ष २० ] जुलै, आगस्ट, सप्टेंबर १९४२ [ अंक ७-८-९

बाबा बाबा, निशिदिनि मना, बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं, कितितरी असे, दिव्य जादू अजाबा ॥



बा आलस्य त्यज, चरणीं, त्या, न भूपा नवाबा ॥
बा बाधा ना, तुज यमगृहीं, जावयाची अजाबा ॥

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णवतरणे नौका ॥ १ ॥

—शंकराचार्य

१०-९-४२ वार्षिक वर्गणी रु. २-८-०

संपादकः—श्रीधर नारायण खारकर,
३७, चरई रोड, ठाणे.

# भक्तांनीं लक्षांत ठेवण्याच्या गोष्टी

(१) नांवें व पत्ते सुवाच्य लिहावेत.

(२) धर्मकृत्याकरितांच्या मागण्या ठराविक पैशासुद्धां मॅनेजर श्री. सं. शिरडी, पो. राहता, जि. नगर या पत्त्यावर कराव्यात. चिटणीस अगर खजिनदार हे शिरडी येथें कायमचे नसल्यामुळें त्यांच्या मार्फतच्या मागण्या उरकण्यास वेळ लागतो.

(३) नुसत्या भक्तमंडळाच्या सभासदत्वाच्या फीचा पैसा भरून भक्तास सभासदत्व प्राप्त होत नाहीं तर त्या सोबत ठराविक नमुन्यांत अर्ज दिला पाहिजे व तो अर्ज संस्थान कमिटीकडून मंजूर झाला पाहिजे. बरेच भक्त त्यांचेकडून फीचा पैसा येतांच त्यास पाठविण्यांत आलेला अर्जाचा फॉर्म भरून पाठविण्याची काळजी घेत नाहींत, तरी भक्तांनीं इकडे दुर्लक्ष करूं नये अशी त्यांस विनंती आहे.

(४) पत्त्याचा बदल त्वरित चिटणीसांकडे कळवीत जावा.

(५) श्री साईलीलेची वर्गणी एडिटराकडे आगाऊ भरली पाहिजे व त्यास पत्त्याचा बदल वेळींच कळविला पाहिजे.

(६) रोख अगर मनिऑर्डरनेंच फक्त पैशाचा भरणा संस्थानकडे घेतला जातो. चेक, पोस्टल ऑर्डर्स वगैरे स्वीकारल्या जात नाहींत व व्ही. पी. केल्या जात नाहींत.

(७) संस्थान फक्त श्रींचे पूजेअर्चेची व्यवस्था करते व फक्त उदीचा प्रसाद पाठवितें. लॉकेट, फोटो, पुस्तकें, निरनिराळे प्रसाद व तीर्थ वगैरे वस्तु पाठविण्याची व्यवस्था करीत नाहीं. दर्शनास आलेले भक्तांस आपले मर्जीनुरूप या गोष्टी करण्यास मुभा आहे.

(८) दर्शनास येणाऱ्या भक्तांस तात्पुरती उतरण्याच्या जागेची सोय संस्थान मोफत करते व भोजनादीची व्यवस्था भक्तांचे मर्जीनुरूप पैसे घेऊन शक्य तितकी करण्याचा संस्थान प्रयत्न करते.

# श्री साईलीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साईनाथः ॥

वर्ष २० } जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर १९४३ { अंक ७-८

## संपादकीय

श्री साईलीलेचे चालू वर्षापासून इंग्रजी सेक्शन घालून रूपांतर करून दोन त्रैमासिक जोड अंक भक्तांस सादर करून, चालू अंक हा तिसरा जोड अं[illegible] भक्तांचे हातीं देण्याची सुसंधी चालू जागतिक परिस्थितींत संस्थानास श्री साईब[illegible] कृपेनें लाभत आहे हें त्यांचेंच लीलेचें एक द्योतक आहे ! आंतापर्यंत भक्तांस ल[illegible] अंक व्ही. पी. न करतांच पाठविण्याचें धोरण आखिलें होतें; कारण व्ही. पी. बोजा निष्कारण उभयपक्षीं पडूं नये व साईभक्त याची जाणीव ठेवून केवळ जागून अंक [illegible] ठेवणें असल्यास वर्गणी भरणें अगर नको असल्यास तसें क[illegible] विनंतीस जागण्यास विसरणार नाहींत ही अपेक्षा होती. परंतु याचे विरुद्ध अनु[illegible] आला असें कष्टानें म्हणावें लागत आहे. तरी एकवार भक्तांस विनंती कीं, ज्यां[illegible] आतांपर्यंतचे अंक मिळाले आहेत ते निदान या वर्षाची वर्गणी त्वरित भरून इच्छा आहे तें कळविण्यास हयगय करणार नाहींत. पुढील जोड अं[illegible]

घेल. तरी ता. १-१२-४३ पर्यंत ज्यांचेकडून वरील खुलासा होणार नाहीं
कडे तो अंक न पाठवितां त्यांचीं नावें पटावरून रद्द करण्यांत येतील.

लीला ही एक बाबांचे भक्तीचें प्रचारकार्य आहे व तें चालू ठेवण्याचे संस्थानचे
ास हातभार लावणें हें प्रत्येक साईभक्ताचें पवित्र काम आहे. परंतु याची जाणीव
याप साईभक्तांस होत नसून वर्गणीदारांचे अभावी ती बंद पडण्याचीं दुःश्चिन्हें पडूं
गलीं आहेत. हा आतांपर्यंतचा अनुभव आहे असें कष्टानें म्हणावें लागत आहे!
साईबाबा भक्तांस योग्य ती प्रेरणा करोत अशी त्यांचे चरणीं नम्र प्रार्थना करण्यापली-
आमचे हातीं काय आहे? असो.

—संपादक

2nd Edition of

## SHRI SAI BABA OF SHIRDI

### A GLIMPSE OF INDIAN SPIRITUALITY

*By*

RAO BAHADUR **M. W. PRADHAN**, J. P.

*IS UNDER PRINT*

**BOOK YOUR ORDER EARLY TO AVOID DISAPPOINTMENT**

ankola,
ıcruz,
3AY 23.

SHANKAR D. BALVALLY,
*Secretary*
**Shirdi Sansthan of Shri Sai Baba.**

|| श्री साई ||

# हेंचि आम्हा वरदान गुरो देई

( वृत्त—दिंडी )

तुझा बाबा आधार एक आम्हा ।
तुझे वांचुनि येईल कोण कामा ।
तूंच अमुचा प्रिय माय-बाप, भाई ।
नको दुसरीं दैवतें अम्हा गेहीं ॥ १ ॥

तुला वांच्छा कसलीच ना दयाळा ।
एक प्रेमाचा मात्र तूं भुकेला ।
मुखें घेतां तव अल्प नाम साधो ।
किती तरले तव भक्त दीन-बंधो ॥ २ ॥

नको आसन वा माळ जपायाला ।
नको पूजन वा भजन करायाला ।
परी प्रेमानें नाम मुखें घेतां ।
सर्व अमुच्या वारिशी घोर चिंता ॥ ३ ॥

असो कोणी श्रीमान वा भिकारी ।
सर्व असती सारखे तुझ्या दारीं ।
पंथ-भेदाला नसे मुळीं ठाव ।
सान थोरांना सारखाच वाव ॥ ४ ॥

नको आराधन अन्य तें कुणाचें ।
एक " बाबा " वांचूनि अन्य वाचे ।
अढळ निष्ठा ती वसो तुझ्या पायीं ।
हेंचि आम्हा वरदान गुरो देई ॥ ५ ॥

कुर्ला
गुरुपौर्णिमा
१८६५

" साईदास "

547

## 'अथनारायणस्तोत्रम्'

नारायण नारायण जय गोविंद हरे ॥ नारायण नारायण जय गोपाल हरे ॥ ध्रु० ॥

करुणा पारावारा वरुणालय गंभीरा ॥ ना. ॥ १ ॥
घननीरदसंकाशा कृतकलिकल्मषनाशा ॥ ना. ॥ २ ॥
यमुनातीर-विहारा धृत-कौस्तुभमणिहारा ॥ ना. ॥ ३ ॥
पीताम्बरा-परिधाना सुर कल्याण निधाना ॥ ना. ॥ ४ ॥
मंजुलगुंजा-भूषा माया मानुष वेशा ॥ ना. ॥ ५ ॥
राधाधर मधुरसिका रजनीकर कुल तिलका ॥ ना. ॥ ६ ॥
मुरलीनाद-विनोदा वेदस्तुत भूपादा ॥ ना. ॥ ७ ॥
बर्हिनिबर्हा पीडानट नर्तन फाणि क्रीडा ॥ ना. ॥ ८ ॥
वारिज भूषा भरणा राजिवरुक्मिणी रमणा ॥ ना. ॥ ९ ॥
जलरुहदलनिभनेत्रा जगदारंभक सूत्रा ॥ ना. ॥ १० ॥
पातक रजनी संहर करुणालय मामुद्धर ॥ ना. ॥ ११ ॥
अघबकक्षय कंसारे केशव कृष्ण मुरारे ॥ ना. ॥ १२ ॥
हाटकनिभ पीतांबर अभयंकुरु मे मावर ॥ ना. ॥ १३ ॥
दशरथराज कुमारा दानवमद संहारा ॥ ना. ॥ १४ ॥
गोवर्धनगिरिधरणा गोपी मानस हरणा ॥ ना. ॥ १५ ॥
सरयूतीर विहारा सज्जन ऋषि मंदारा ॥ ना. ॥ १६ ॥
विश्वामित्र मखत्रा विविधपरा सुचरित्रा ॥ ना० ॥ १७ ॥
ध्वजवज्रांकुशपादा धरणीसुतसह मोदा ॥ ना० ॥ १८ ॥
जनकसुता प्रतिपाला जयजय संस्मृति लीला ॥ ना० ॥ १९ ॥
दशरथ वाग्धृतिभारा दंडकवन संचारा ॥ ना० ॥ २० ॥
मुष्टिक चाणुरहंता मुनिजन मानस हंता ॥ ना० ॥ २१ ॥
वालिविनिग्रह शौर्यावरसुग्रीव हितार्या ॥ ना० ॥ २२ ॥
मां मुरलीकर धीवर पालय पालय श्रीधर ॥ ना० ॥ २३ ॥
जलनिधि बंधनधीरा रावण कंठ विदारा ॥ ना० ॥ २४ ॥
ताटीमददलनाढ्या नटगुणविविध धनाढ्या ॥ ना० ॥ २५ ॥
गौतमपत्नी पूजन करुणाघनावलोकन ॥ ना० ॥ २६ ॥
संभ्रम सीताहारा साकेतपुर विहारा ॥ ना० ॥ २७ ॥
अचलोधृति चंचत्कर भक्तानुग्रह तत्पर ॥ ना० ॥ २८ ॥
नैगमगान विनोदा रक्षःसुत प्रल्हादा ॥ ना० ॥ २९ ॥
भारतीयतिवर शंकर नामामृत मखिलांतर ॥ ना० ॥ ३० ॥

॥ ३ ॥

राग **हमीर** तिताल ( नारी नजर—चाल )

भजरे मनुजा प्रभुसाई ॥ धांवा करितां भक्तांलागी ॥
धांवुनि ये आई ॥ भजरे ॥ ध्रु० ॥

मानवरूपीं ब्रह्मवृक्ष हा । स्वानंदें राही ॥ भजरे ॥ १ ॥
उपदेशानें स्वात्मसुखाचा । अनुभव दे घेई ॥ २ ॥
मसजिद् असतां मंदिर भासवी । दत्तगुरु पाहीं ॥ ३ ॥ भजरे

॥ ४ ॥

**जोगी** राग **पिलु.**

जोगी अपने कंबल को तानता है ॥ शालु दुशाला पसम् जानता है ॥ धृ० ॥
धनदौलत और गृहसुत जाय । इन सबसे अलग रहता है ॥ शालु ॥ १ ॥
इस दुनियाके गहेरे फंदोमें । खुले आंखोंसे चलता है ॥ २ ॥
सोना मिट्टी समही देखे । मस्त धुंदमे फिरता है ॥ ३ ॥
नानू कहता जोगी लच्छन । गुरुकृपासे मिलता है ॥ ४ ॥

## ॥ विठ्ठलाची दृष्ट ॥

पंढरिच्या राया तुला दृष्ट जाहली । ओंवाळिती तुलारे देवा संतमंडळी ॥
—भक्तमंडळी ॥ धृ. ॥

पुंडलिकासाठीं हरी ये पंढरीसी । विटेवरी नीट उभा हात कटेसी ॥
गरुडपारीं गरुड उभा त्याचि सेवेसी । सुरवरमुनी वाट पहाती महाद्वारासी ॥
मूर्ति साजिरी गोजिरी पहाण्या गर्दी दाटली ॥ ओंवाळिती ॥ पंढ० ॥ १ ॥
दामाजीसाठीं तूंरे हरी महार झालासी । कान्होपात्रा कलावंती नेली पायांसी ॥
मीराबाई विष पितां तिजसी रक्षिसी । पूतनेचे स्तन पिउनी गरळ जिरविसी ॥
ऐसी तुझी देवारे लीला पुराणीं वर्णिली । ओंवाळिती ॥ २ ॥
नाम्यासंगें एकताटीं देव जेविले । जनाबाई सुळीं जातां तिजला रक्षिलें ॥
एकनाथागृहीं देवा पाणी वाहिले । द्रौपदीच्या छळणीं तिला वस्त्र पुरविलें ॥
ऐसी तुझी बिरुदें देवा संतीं गाइलीं ॥ ओंवाळिती ॥ ३ ॥
यापरी संतभक्त तुला स्तवुनी वानिती । निंबलोण उतरुनी तुझी दृढ काढिती ॥
गोपगोपीं मिळुनी तुला प्रेमें बाहती । ब्रह्मानंद नेत्रीं भरुनी अश्रु ढाळिती ॥
दासी रखुमाबाई तुझ्या पायां लागली । ओंवाळिती ॥ ४ ॥

संपूर्ण

॥ शुभं भवतु ॥

5.48

# एक अप-प्रवाद

## लेखक—सुमन सुंदर

अमकातमका-बाबांचा एक भक्त दुर्वर्तनी होता. पण त्याचें पारिपत्य बाबांनीं केलें नाहीं. उलट तो भक्त म्हणून बाबांच्या जमान्यांत मिरवीत असे. अशा आशयाचा एक अप-प्रवाद बाबांविषयीं प्रसृत झाल्याचें निदर्शनास आलें.

पण अशा तऱ्हेनें आरोप सहन करणारे बाबा हे कांहीं एकटेच संत नव्हत. प्रत्येक संताला अशा आरोपांना टक्कर द्यावी लागते. पण सहसा ते कोणाच्या तोंडीं लागून त्याचे उत्तर देत नाहींत. उलट शांतचित्तें असल्या आरोपापुढें आपलें मस्तक नमवितात. अर्थात् टीकाकाराच्या हातीं तें एक कोलितच मिळतें !

असे भक्त आतां आहेत आणि पूर्वीं नव्हते असें नाहीं. पूर्वींही असे भक्त होते आणि तत्कालिन संतांनीं पूर्वी आपल्या ग्रंथांत त्यांचीं निर्भर्त्सना पण केलेली आहे.

> 'विषयी' लोक श्रवणा येती । ते बायकाकडेच पहाती.
> चोरटे लोक चोरून जाती । पादरखी ॥ दा. स. १८-१०-२६

किंबहुना अव्यभिचारी भक्ती करणारा भक्तच मला दुर्लभ असतो असा उघड आरोप भगवंतांनीं अखिल भक्तवृंदावर केला आहे.

> बहुनां जन्मनां अंते ज्ञानवान् मां प्रपद्यते ।
> वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः भ. गी. ७-१९

असे असतां अशा लोकांना आपल्या दुर्वर्तनापासून परावृत्त करण्याऐवजीं त्यांना हे संत लोक चढवून कां ठेवतात? अशानें ते त्यांच्या दुर्वर्तनास प्रोत्साहन देत नाहींत का? असे प्रश्न प्रत्येक विचारी माणसाचे डोक्यांत घोळतात आणि याचें समर्पक उत्तर न मिळाल्यामुळेंच पुष्कळ लोक आपल्या सद्गुरूविषयींसुद्धां साशंक वृत्ती होतात. अर्थात हें कृत्य त्यांना स्वतःलाच आत्मघातास नेणारें असतें. पण हें जरी खरें असलें तरी त्याची संशयनिवृत्ती करण्याचा प्रयत्न न करितां त्यांना नांवें ठेवणें शिष्टसंमत ठरणार नाहीं.

अशाच एका मोहासक्त भक्ताला फुसलावून लाडावून ठेवल्याबद्दल मी त्याच्या गुरूस दोष देण्यास उद्युक्त झालों होतों. पण त्याच क्षणीं त्या भक्ताच्या स्वभावाची परिपूर्ण माहिती असलेल्या एका व्यक्तीनें मला खुणावलें कीं, तुम्ही म्हणतां तें खरें, पण हीं माणसें अशीं आहेत कीं, त्यांच्या गुरूनें त्यांना संभाळून घेतलें, म्हणून इतपत तरी त्यांना जागरूक आहे. जर का गुरु त्यांच्याशीं न्यायनिष्ठुर होता तर त्यांच्या हातून मुदलांतच कांहीं झालें नसतें. त्यांच्या गुरूला हें अनुभवानें पटलें म्हणूनच त्यानें त्यांना अशी सवलत दिली. हें ऐकतांच माझ्या विचारांना निराळी चालना मिळाली.

याच संधानांत एका विद्वान् ज्योतिषाशीं चर्चा करण्याचा मला योग लाभला.

पारमार्थिक आत्मोन्नतीस प्रयत्न श्रेष्ठ' अशी तडजोड मीं माझ्या पूर्व लेखनाधारें सुचविली. त्यावर त्यांनीं पारमार्थिक आत्मोन्नतीहि ज्योतिषांच्या गणितांत म्हणजेच प्रारब्धाच्या नकाशांत दृग्गोचर होते असें प्रतिपादिलें व त्याला पुरावा म्हणून माझीच कुंडली हातीं घेतली आणि त्यांतील गृहयोगावरून मी प्रयत्नवादी का आहे, पूर्व कर्मार्जित-ज्ञानयोग प्रज्वलित असल्यानें माझ्या हातून बौद्धिक लेखन कसें होतें इ. विवेचन साधार केलें. मी त्या शास्त्रांत पारंगत नसल्यामुळें मला त्यांना प्रत्युत्तर असें देतां येत नाहीं. तरी पण त्यांच्या सांगण्याचें मला सादर कौतुक वाटलें व एक प्रकारें माझी बुद्धि भारली गेली.

एकूण पूर्वकर्मार्जित पुण्याईच आत्मोन्नतीस कारणी होते तर अशी माझा प्रयत्नवाद खोडून काढणारी आशंका मनांत उद्भवली तोंच त्याबाबत गीतेनें पण मला गोता दिला. योगभ्रष्टाची स्थिति सांगतांना भगवंतांनीं म्हटलें आहे कीं,

'दिव्यदेहधरोयोगाद्भ्रष्टः सार्भोग मुत्तमम् ॥
भुक्त्वा योगिकुले जन्म लभेच्छुद्धिमती ॥ २५ ॥
पुनर्योगी भवत्येव संस्कारात्पूर्वकर्मजात् ॥
नहि पुण्यकृतां कश्चिन्नरतां प्रतिपद्यते ॥ २६ ॥

गणेशगीता अ० ५

पुण्यकृतांचें पूर्वपुण्य पुढील जन्मीं असें चांगलें फळास येतें. अर्थात् या जन्मीं पापकर्म करणाऱ्यांचे पापास गतजन्मीचें त्यांचें पापकर्मच कारणीं असलें पाहिजे आणि पुढील जन्मींही ते पापांतच राहणार. अरेरे, हे पापकर्मी असेच खितपत पडणार तर! मग ज्ञान–भक्ति इ. अवडंबराचा डोलारा अगदींच कुचकामी ठरतो तर! मी या विचारांनीं विमूढ झालों.

माझा प्रयत्नवाद माझ्या मदतीस धांवत आला. मी पूर्वी एका लेखांत सर्वच संचित आपण प्रारब्धरूपानें या जन्मीं बरोबर आणावें आणि या जन्माचें आपलें कर्मच पुढील जन्माचें क्रियामाण होतें, असा युक्तिवाद केला होता. त्याची मला आठवण झाली. जर या जन्मीं लोकांनीं सत्कृत्यें केलीं तर पुढील जन्मीं तरी त्यांची आत्मोन्नति होईल असा आशावाद निर्माण झाला. हें सत्कृत्य करण्यास तरी आपण स्वतंत्र आहोंत, कां पूर्व जन्मीचें ऋणानुबंधी आहों, तेवढ्यापुरती आपल्या आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ती आपणास स्वतंत्रपणें सत्प्रवृत्त करते आणि सद्गुरू आदींच्या रुपांत ती आपणास सन्मार्ग दर्शन करते.

आणि आपलें हें मार्गदर्शन सुलभ होण्याआधींच कोणत्याही सद्ग्रंथांत सत्प्रकाश देणारे असेच चरित्र दीप लावलेले असतात. उदाहरणार्थ, आपण साई सत्चरित्रच घेऊं. त्यांतील मोजक्या अध्यायांतील मोजक्या भक्तांच्या मोजक्या कथा म्हणजेच कांहीं बाबांचा मोजका व्याप नव्हे. बाबांचे भक्त म्हणविणारे अगणित आहेत. त्यांच्या वृत्ती अगणित आहेत. कोणी बाबांची निंदा कर[illegible] आमतील. कोणी स्वप्रति[illegible]

भरले असतील आणि कोणी आपल्या अपकृत्यावर बाबांच्या नांवाची शाल ओढीत असतील. भगवदुक्तीप्रमाणें बाबांशीं तादात्म्य पावणारे क्वचितच कोणी असतील. या सर्वांचा जर उघडा परामर्ष साई सच्चरित्रांत घेतला गेला असता तर सद्ग्रंथ या संज्ञेस ते पात्र न ठरतां कचऱ्याची टोपली बनले असते व त्यापासून आपणा साधकांस सन्मार्ग-दर्शन घडलें नसतें.

या सन्मार्ग दीपांत जाळण्यास तूप पाहिजे आणि तें आपणच पुरविलें पाहिजे. आपलें आयुष्य हें पापपुण्याचे धुपाटणे आहे. शांत लोक पुण्याची बाजू वर करून त्यांतील तूप या दीपांत घालीत असतात. भक्तांचें चांगलें तेवढेंच ते उचलून धरतात व वाइटा-कडे–दुष्कृत्याकडे दुर्लक्ष करतात. तसें न करतां ते जर भक्तीचें पाप चिरडण्यासाठीं धुपाटणे उलटे करतील तर तुप काढताना तेल खाली ओघळतच असते. आणि आता धुपाटणे उलटे केल्यामुळे तूपहि खाली ओघळून जाईल. म्हणजे तेल गेलें तुप गेलें असें होऊन भक्तांच्या रूपांत मतिमंद धुपाटण्याचा ढोकळा मात्र संतांच्या हातीं येईल.

म्हणून संतलोक भक्तांचे सत्यकर्म–रूप तूप तेवढें घेऊन ज्ञानज्योत तेवत ठेवीत असतात. तसें करतां ज्ञानज्योत कायम राहून भक्ताचें अज्ञानरुपी तेल आपोआपच खालीं ओघळत असतें. त्यांतील उपाधि जागृत झाली कीं मायिक उपाधीचा लय आपोआपच होत असतो. पूर्वार्जितामुळें तो या जन्मीं नच झाला तरी भगवंताच्या आश्वासनाप्रमाणें तो कालांतरानें तरी पूर्णत्वास जाईल. याच दूरदृष्टीनें संतलोक भक्तांच्या अपकृत्याकडे ताबडतोब दुर्लक्ष करतांना दिसतात.

याचा अर्थ असा आहे कीं, ‘ आपणही तसेंच वागावें. आपणही आपल्या अप-कृत्याकडे डोळेझांक करावी.’ तसें आपण केलें तर आपण आत्मघ्न ठरून ‘ जैसे ज्याने केले, तैसे तया फळ आले, त्यांत कोणाचे काय वा गेले ।।’ असा आपला उपहास केला जाईल. ‘ बीज तसे दाणे ’ हा न्याय येथेंही अबाधित आहे. आपण जें सत्कर्म करूं तेंच आपल्याला सुफलदायी होणार आहे, या करतां सत्कृत्य करण्याचा आणि अपकृत्य न करण्याचा आपण बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला पाहिजे, तरच आपली आत्मोन्नति होईल.

असेल जरी माझा हरी । तरी मज देईल खाटल्यावरी ।
म्हणीची या सत्यता खरी । परि ती अन्न आच्छादनी ।
परी ती जो परमार्थी लावील । परमार्थ सर्वस्वी नागवील ।
जेथें जो करील तेथे भरील । अमोल हे बोल बाबांचे ।।

साईसत १९।२०९।१०

दुसऱ्याचे दोष चिवडून आपले गुण उजळतात असें नाहीं, तर आपले दोष काढून टाकल्यानेंच आपल्या सद्गुणांचा प्रकाश पडतो. म्हणून साधकानें नेहमीं आत्मपरीक्षण करावें. दुसऱ्याचे दोष शोधण्यांत मनुष्य जसा निपुण असतो तशा नैपुण्यानें आपल्याला तपासीत राहिल्यावर ज्ञान कसें होणार नाहीं ?

जर दुसऱ्याची परीक्षा करायचें सोडून पुरुष आपल्या गुणदोषांचा विचार करूं लागेल तर त्याला सर्व साधनें प्राप्त होऊन तो सिद्ध पुरुष होईल. [श्रीदत्त भार्गव संवाद प्र. २१]

जो अपकृत्य करतो त्याचें फळ त्याला मिळालेलें पुष्कळ वेळां आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. त्यापासून 'पुढच्यास ठेंच मागच्या शाहाणा' या न्यायानें आपण तशी ठेंच न खाण्याची खबरदारी घेतली पाहिजे. हाच बोध आपण घेतला पाहिजे. तसें न करतां त्याच्याकडेवर डोळे करून बघत बघत जर आपण पुढें तसेंच चाललों तर स्वतःवरच ठेंचाळून हंसे करून घेण्याचा प्रसंग ओढवेल. म्हणून अशा वेळीं बाबांनीं दिलेला इषारा आपण नेहमीं समोर ठेवला पाहिजे.

'पहा त्या जिव्हेला काय गोडी।
जना लोकांची विष्टा चिवडी ॥
बंधु स्वजनावर चडफडी।
यथेष्ट फेडी निज हौस ॥
बहुत सुकृताचिये जोडी।
आला नरजन्म ऐसा जो दवडी ॥
तया आत्मवना ही शिरडी।
सुरत परवडी काय दे ॥

साईसत १९।२०५-६

---

# नोटीस

श्री. साई बाबा यांच्या शिरडीं संस्थानची संस्थान कमिटी, श्री साई बाबांच्या भक्तांच्या माहितीसाठीं जाहीर करीत आहे कीं, संस्थानच्या ऑन. सेक्रेटरी आणि ऑन. ट्रेझररचे पत्ते खालीलप्रमाणें आहेतः—

श्री. शंकरराव डी. बलवली, वांकोला, सांताक्रुझ, मुंबई नं. २३ ( ऑन. सेक्रेटरी ).

श्री. डी. व्ही. सांबारे, विलेंपारलें, मुंबई २४ ( ऑन. ट्रेझरर ).

सध्यां काम करणारे मेसर्स एस. एन. खारकर, ३७ चरईरोड, ठाणें, ऑन. सेक्रेटरी आणि आर. व्ही. घैसास, गोखले रोड, दादर, ऑन. ट्रेझरर यांना त्यांचे विनंतीनुसार कमिटीनें त्यांचे कामांतून मोकळें केलें आहे.

श्रीसाईनाथ

# कै. पूर्णविरक्त, भक्तशौंड श्री. बाळासाहेब भाटे

## यांचें अत्यल्प चरित्र

श्री. बाळासाहेब भाटे हे मूळचे बडोद्याचे रहिवासी. त्यांचें शिक्षण, पुण्यास त्यांचे सेवानिवृत्त आतेबंधु बडोद्याचे दिवाण, दिवाणबहादूर बळवंतराव देव, यांचे घरीं झालें. पुण्यासच ते बी. ए. झाले.

२. नंतर त्यांना प्रथम नगर तालुक्यांत मामलतदार कचेरींत कारकुनाची जागा मिळाली. नंतर कांहीं दिवसांनीं ते तेथेंच अवलकारकून झाले. नंतर कांहीं कालांनीं प्रांताचे शिरस्तेदार झाले. त्यानंतर त्यांना श्रीगोंद्यास मामलतदार नेमलें. व नंतर तेथून त्यांची बदली खानदेशांत साखरी तालुक्यास झाली.

३. बाळासाहेब नगरला अवलकारकून असतां कै. भक्तसिंह श्री. नानासाहेब चांदोरकर हे नगर जिल्ह्यांत राहुरीला अवलकारकून होते. नानासाहेब पुढें नगरच्या कलेक्टरचे चिटणीस झाले. नानासाहेब व बाळासाहेब हे कॉलेजमध्यें असल्यापासून एकमेकांचे स्नेही होते. नानासाहेब बाबांकडे सुमारें १८९२ सालापासून जाऊं लागले व त्यांचे सांगण्यावरून बाळासाहेब १८९४–९५ चे सुमारास प्रथम शिरडीस बाबांच्या दर्शनास गेले. नंतर ते शिरडीस सहकुटुंब जात असत.

४. श्रीसमर्थ सद्गुरु रामदास स्वामींचे एकंदर अकरा मठ आहेत. त्यापैकीं चाफळचा पहिला व बडोद्याचा दुसरा. बडोद्याचे मठांत बाळासाहेबांचे श्वशुर श्री. भाऊ-महाराज शिरगांवकर रहात असत. या मठांत श्रीराममूर्तीची स्थापना केलेली होती. या मठाची सर्व व्यवस्था श्रीभाऊमहाराजच पहात असत. रामदासस्वामींचे शिष्य श्रीलक्ष्मण महाराज यांनीं हा मठ बांधला. या मठास राममंदिर म्हणतात. हल्लीं या मठांत लक्ष्मण-महाराजांची समाधि आहे.

५. बाळासाहेब खानदेशांत साखरी तालुक्यास मामलतदार असतां एके वेळीं त्यांचे श्वशुर श्री भाऊमहाराज शिरगांवकर त्या ठिकाणीं गेले. हे मोठे योगी व अधिकारी संत होते. त्यांनीं तेथें कीर्तन केलें. संतावतंस श्री कबीर व कमाल यांचें आख्यान लाविलें होते, तें बाळासाहेबांनीं अंतःकरणपूर्वक श्रवण केलें.

६. श्री भाऊमहाराजांचें कीर्तन ऐकण्यापूर्वीपासून बाळासाहेब सहकुटुंब शिरडीस बाबांचे दर्शनास जात असत व नानासाहेबांचे मुखांतून बाबांच्या अतर्क्य लीलाही ऐकत. बाबांच्या अगम्य व आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या, नानासाहेबांच्या मुखांतून गंगौघा-प्रमाणें स्रवणाऱ्या लीलांचें वर्णन, श्री सद्गुरु बाबांचें प्रत्यक्ष पुण्य व पवित्र दर्शन, भाऊ-महाराज यांनीं अधिकारयुक्त वाणीनें केलेलें प्रासादिक, चित्ताकर्षक हृदयंगम व कर्ण-

परिणाम होऊन वैराग्य वेणीमाधवाचें अखंड दर्शन घेऊन त्याच त्रिवेणींत संसारास निरंतरची तिलांजली देण्याकडे त्यांचें मन वेधलें गेलें.

७. श्री भाऊ महाराजांचें कीर्तन श्रवण केल्यावर लवकरच बाळासाहेब रजा घेऊन सहकुटुंब शिरडीस आले. नंतर त्यांनीं ६ महिन्यांची रजा घेतली व ते शिरडीसच राहिले, ते पुन्हा कामावर रुजू झालेच नाहींत. त्याचवेळीं, मध्यभागचे रेव्हेन्यु कॅमिशनर मेहेरबान कर्टिस साहेब, त्यांचे परसनल असिस्टंट श्री. जोगळेकर यांचेसह तेथें आले. त्यांनीं बाळासाहेबांस बोलावून घेतलें व कामावर रुजू व्हा असें त्यांस समक्ष सांगितलें. एकदां जी मी लेखणी खालीं ठेविली आहे ती मी पुन्हा हातीं घेणार नाहीं असें बाळासाहेबांनीं कमिशनरसाहेबास चोख, स्पष्ट व बाणेदार उत्तर दिलें व तेव्हांपासून ते पुन्हां नोकरीवर गेले नाहींत.

८. त्या वेळीं त्यांचें वय अजमासें ३७–३८ वर्षांचें असेल. नोकरीही १२–१३ वर्षेंच झाली असेल. इतक्या थोड्या नोकरीचें योग्य कारणावांचून सेवानिवृत्तवेतन ( Invalid pension ) तरी देणार कोण. मग बाळासाहेबांचा सहकुटुंब सहपरिवाराचा तेथें निर्वाह चालावा कसा ! कै. श्री. काकासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर, माधवराव देशपांडे वगैरे बाळासाहेबांचे स्नेह्यांपुढें हा एक मोठा प्रश्नच पडला. कोणी कांहीं द्रव्याची मदत केली तरी ती घ्यावयाची नाहीं अशी बाळासाहेबांची वृत्ती, मग हें जुळावें कसें ! पेनशनचा अर्ज करावा किंवा न करावा हें बाबांनाच विचारावें व त्यांनीं सांगितल्यास करावा असें सर्वांच्या मतें ठरलें व बाळासाहेबांनींही त्या गोष्टीस मान्यता दिली. त्याप्रमाणें बाबांना विचारतां बाबा म्हणाले, ‘ अर्ज करावा आपल्यास पेनशन मिळेल. ’ नंतर अर्ज केला व कोणत्याही प्रकारचें विघ्न किंवा अडचण न येतां, एकोणतीस रुपये महिना पेनशन मंजूर झालें. ही बाबांची कृपा व अगाध लीला.

९. त्या वेळीं बाळासाहेबांचा पगार १७५ रुपये होता. त्यावर जवळ जवळ $\frac{१}{६}$ पेनशन बसलें असें दिसतें. बाळासाहेब बाबांचे दर्शनास दररोज फक्त दोनच वेळां जात-दुपारीं व सायंकाळीं. बाकीचा सारा वेळ ग्रंथवाचनांत घालवीत. त्यांचे कुटुंब, त्यांच्या ३ मुली व २ मुलगे असा त्यांचा तेथें परिवार होता.

१०. बाळासाहेबांचे थोरले चिरंजीव बाबूराव यांस काकासाहेब दीक्षित यांनीं आपले मुलाप्रमाणें मानून, आपल्या मुलाबरोबरच त्यांना बी. ए. पर्यंत शिक्षण दिलें व बी. ए. झाल्यावर लागलीच इंपीरिअल बँकमध्यें नोकरीही लावून दिली. बाबूराव बुद्धिमान व हुषार होते. पण त्यांचा कल संसाराकडे नसून परमार्थाकडे असे व त्यामुळें ते लग्नाचे भानगडींत मुळींच पडले नाहींत. त्यांना नंतर कांहीं दिवसांनीं अल्प वयांतच क्षयरोगाची व्यथा जडली. व त्यांतच त्यांचा नाशिक येथें अंत झाला. त्यावेळीं त्यांना ८० किंवा ९० रु. पगार होता. त्यांचें वय २७–२८ वर्षांचें असेल.

११. बाबूरावांचे धाकटे बंधु रामचंद्र बळवंत ऊर्फ बापूराव. यांचें शिक्षण हिशोब शाखेंतील ( Account branch ) जी. डी. ए. पर्यंत झालें असून त्यांना इंपीरियल बँकमध्यें ... [illegible]

बंधुप्रमाणें क्षय व्याधीनें ग्रासलें. त्यांनीं नंतर रजा घेऊन बरेच ठिकाणीं हवापालट केला. शेवटीं शिरडीस बाबांचे चरणापाशीं आले. त्या वेळीं त्यांचेजवळ फक्त त्यांच्या वडील भगिनी श्री. साईमा ऊर्फ माई होत्या. शिरडीस त्यांना जरा बरें वाटूं लागलें. म्हणून त्यांनीं शिरडी संस्थाननें तेथें काढलेला इंग्रजी तीन इयत्तेपर्यंतचा वर्ग शिकवण्याचें व शिरडी संस्थांचे हिशोबाचें व इंग्रजी मराठी पत्रव्यवहाराचें काम हातीं घेतलें. त्यांना संस्थान या कामगिरीबद्दल दरमहा २० रुपये देत असे. परंतु निर्घृण काळाला तें आवडलें नाहीं. तेथल्या त्यांच्या सुमारें २–३ वर्षांच्या अवधींतच दुष्ट काळानें त्यांजवर झडप घातली व त्यांचें जीवित हरण करून त्यांच्या थोरल्या भगिनी माईस सर्वस्वी निराधार करून सोडलें. असो. श्रीसाई बाबा सत्ताबलीयसी. बापूराव बाबाप्रेमी, हुषार, बुद्धिवान, प्रामाणिक, अत्यंत गरीब स्वभावाचे, कोमल अन्तःकरणाचे, आज्ञाधारक, विनयशील व गोडस्वभावाचे होते. त्यांनीं लग्न केलें नव्हतें.

१२. आतां बाळासाहेबांचे मागें त्यांच्या वडील कन्या श्री. साईमा ऊर्फ माई शिवाय कोणी राहिले नाहीं. त्यांचें लग्न नानासाहेब चांदोरकर यांनीं करून दिलें होते. पण दुर्दैवानें लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांत त्यांना वैधव्य प्राप्त झालें. त्या हल्लीं शिरडीस बाबांचे चरणाजवळच त्यांची सेवा करून राहिल्या आहेत. त्या अत्यंत सज्जन, गुणी गरीब, सालस, बाबा प्रेमी आहेत. शिरडी संस्थान कमिटीच्या अनुमतीनें शि. सं. कमीटीचे प्रशस्थ थोर व कोमल अन्तकरणाचे परोपकारी, गरिबावर दयाकरणारे चिटणीस श्री. श्रीधर नारायण ऊर्फ नानासाहेब खारकर ठाणें निवासी यांनीं माईच्या निर्वाहाची तेथें चांगली सोय करून ठेविली आहे.

१३. श्री. बाळासाहेबासारख्या बाबांच्या कृपेनें बनलेल्या पूर्णविरक्त व निस्सीम सद्‌भक्ताचें आलोकलेख्य ( Photo ) वैराग्य आदर्श म्हणून बाबांचे मंदिरांत संस्थान खर्चानें आवश्य असावयास पाहिजे व तो तेथें ठेवावा अशी माझी शि. सं. कमिटीस नम्र विनंति आहे.

१४. बाळासाहेबांचे हाताखालीं काम केलेले श्री. तात्या औटी व बाळासाहेबांचे धाकटे चिरंजीव बापूराव यांचेकडून जितकी मिळाली तितकी माहिती घेऊन हें अत्यल्पचरित्र लिहिलें आहे व तेंच पंचदलाचें व चतुर्दश केसरांचें वैराग्य पंकज, अनन्य भावानें श्रीसमर्थ सद्‌गुरु साई परमात्म्याचे पुण्य व पवित्र चरणीं नम्रपणें अर्पण करून सहृदय वाचकवृंदाची रजा घेतों.

ठाणें, गुरुवार आषाढ कृ. १३ } **संताचा चरणरज दासानुदास,**
ता. २९–७–४३ } **बाबांचें बाळ**

# अनुभव.

[१]

श्री. कर्णिक, रजिस्ट्रेशन इन्स्पेक्टर, जुन्नर. जि. पुणें—हे जुलैमध्यें शिरडीस श्रीचे दर्शनास आले त्यावेळीं समक्ष सांगत होते कीं, आपण आपले दोन मुलींचे लग्नाबद्दल बाबास नवस केला होता. तो फेडण्याकरितां गुरुपौर्णिमेच्या उत्सवास शिरडीस जावें असा बेत ठरविला होता. परंतु त्या वेळीं येतां आलें नाहीं. त्यामुळें मनास फार वाईट वाटलें व बाबांची पुन्हा मनापासून करुणा भाकली कीं, बाबा मला शिरडीस कां नेत नाहींत ! या गोष्टीस एक दोन दिवस लोटले असतील तोंच ऑफीसमध्यें आपली वरचे ग्रेडवर बदली झाल्याचा हुकूम मिळाला व आज हा बाबांचे कृपेनें त्यांचे दर्शनास येण्याचा योग नाशिकला प्रमोशनवर बदली होऊन आला. असो, बाबा भक्तांचे कळकळीचे हांकेस कसे जागृत आहेत याचा हा माझे अल्पमतीला दाखला पटला.

[२]

श्री. जे. बी. पाटणकर, कस्टोडियन कार्ला केव्हज—हे जुलैमध्यें श्रीचे दर्शनास आले होते. त्यांनीं पुढीलप्रमाणें आपला अनुभव सांगितला :

गतवर्षी कार्लें गांवाचे आसपास दरोडे पडूं लागले तेव्हां आपणांस बाबांनीं जपून राहण्यास सूचना दिली व त्यावरून आपण आपले कुटुंबास माहेरीं कल्याणास पाठवून देऊन ७ पहारेकरी बंदोबस्तास असत त्यांचे सोबतीनें झोंपत असूं. गेल्यां वर्षी मे महिन्यांत त्यांचे घरावर दरोडा पडला. कठीण प्रसंगीं कोण कामास येतो याचा अनुभव त्यास बाबांनींच दिला व बाबाच अशा प्रसंगीं मदत करतात याचें प्रत्यंतर त्यांस समजून आलें.

दरवड्याचे आगोदर कुटुंबाचे व त्यांचें बोलणें होऊन त्यांचे कुटुंबानें जपूं बाबांच्याच आज्ञेनें जवळचा ३।४ हजाराचा ऐवज एका साध्या डब्यांत घालून तो डबा बाबांचे फोटोखालीं ठेवून त्यावर उदी टाकली होती.

दरोडेखोर आलेबरोबर पहारेकरी भयभीत होऊन पळून गेले. दरोडेखोरांनीं पाटणकरांस एका कोपऱ्यांत दाबून धरून, निष्ठुर मनुष्य ज्याप्रमाणें जनावरांवर झोड घालतो त्याप्रमाणें त्यास बेदम मारण्यास सुरवात केली व आपण आतां मरणार असें त्यांस वाटलें. नंतर त्यांचे देखत चोरांनीं सर्व सामान बाहेर वाहण्यास सुरवात केली. ट्रंका उचलून नेल्या, डबे अस्ताव्यस्थ खालीं फेकून दिले व चांदीचें किरकोळ सामान रानांत इकडे तिकडे लपवून ठेविलें. 552

इकडे बाबांनीं एका पहारेकऱ्यास बुद्धि देऊन १।१॥ मैल खाली असलेले गांवीं ओरड केल्यामुळें त्या गांवचे सर्व लोक धांवून आले. कारण हे सर्व लोक एकविरेचे भक्त ( कार्लेकेव्हमधील देवीचें स्थान ) असून त्यांस बाबांचे विषयीं आदर आहे व पाटणकर तर एकविरादेवस्थानचे मॅनेजर व बाबांचे भक्त पडले.

मुख्य लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, चोरांनीं सर्व लूट केली त्या वेळीं बाबांचे फोटो खालीं असलेला डबा ज्यांत सर्व ऐवज होता व ज्या ठिकाणीं उदी टाकिली होती त्यास मात्र चोरानीं हातही लावला नाहीं व जड ऐवज कांहीं एक गेला नाहीं.

पुढें पोलीस तपास होऊन दरोडेखोर सांपडले व बाबांचे कृपेनें याच तपासांत आणखी ९ दरवडे सांपडले व सर्वांचा फायदा झाला. विशेष म्हणजे पाटणकरांचे कुटुंबानें एका फडक्यांत सुमारें अर्धातोळा सोनें बांधून ठेवलें होतें तें, एक पावली व एक आधेली हेंही जशेच्या तशेच सांपडले व चोरांनीं रानोमाळ पाटणकरांकडील फोटो टाकले होते तेही सांपडले.

अखेर वरिष्ठांकडून पाटणकरांस प्रमोशन व लायक पहारेकरी माणसें देण्यांत आलीं.

यावरून बाबा कसे भक्तपराधीन आहेत हें दिसून येईल.

कार्ला केव्हज हीं दोन हजार वर्षांपूर्वीचे हिंदुस्थानचें अखंड वैभव असल्यामुळें परदेशीय लोक उत्सुकतेनें ती पाहण्यास फार येतात व तेथेंच पाटणकरांनीं लाविलेला बाबांचा फोटो आहे, तो देवाचा आहे—तो गुरूचा आहे असें ऐकून व फोटोकडे पाहून प्रेमानें त्यास अभिवंदन करितात. यावरून परदेशचे लोकांचे अंत:करणांत बाबा कसकसे जाऊन बसत आहेत हें दिसून येईल. बाबा म्हणतच असत कीं, माझा भक्त साता समुद्रापलीकडे असो मी त्यास खेंचून आणीन !

[ ३ ]

श्री. आर. के. इंगले. टीचर, एम्. एस्. मराठी मिडल स्कूल, जुना तोफखाना इंदोर—हे आपले ता. २३—६—४३ रोजीं मॅनेजर शि. सं. ( मि. गोविंदराव कुलकर्णी ) यांचें नांवें पत्रानें कळवितात कीं :—मी मनमाडला जेव्हां आलों तेव्हां गाडींत बसतांना अतिशय गर्दी असल्यामुळें तेथें माझें 'मॅनीबॅग' हरवलें. त्यांत १ रु. व इंदूरपर्यंतचें तिकीट होतें तें सर्वच नाहींसें झालें हें मला गाडींत बसल्यानंतर कळलें. जवळ एक पैसा नाहीं अशा स्थितींत बिना तिकिटानें आणि तेंहि इंटर क्लासमध्यें बसणें अत्यंत धोक्याचें असतें. तरीपण मी साईबाबांचें सारखें नांव घेणें सुरू केलें व म्हटलें कीं, "हे श्रीसाई मला कसेंहि करून खांडव्यापर्यंत सुखरूप पोहोंचव.' माझी ही नम्र

प्रार्थना ऐकून मला खरोखरच खांडव्यापर्यंत सुखरूप पोहोंचविलें. माझ्या समक्ष दोघे तिघे विना तिकिटाचे पकडले गेले. परंतु मला कोणी विचारलें नाहीं हीं महाराजांचीच कृपा म्हणून समजावी. खांडव्याहून मी येथें सुखरूप पोंहोचलों. आपण पाठविलेली उदी व रसीद सुखरूपपणें पावली. माझी तुम्ही उत्तम व्यवस्था ठेवल्यामुळें मी आपला सर्वतोपरी ऋणी आहें. आपला व्यवहार कमीत कमी पत्रानें तरी चालू रहावा अशी इच्छा आहे. साई महाराज आपणांस चिरायु करो अशी प्रार्थना करून मी आपली रजा घेतों.

---

॥ जय श्रीसाई हरी ॥ २५-८-४३

खारकरसाहेब यांस सविनय नमस्कार वि. वि. माझ्याजवळ श्रीचे अनेक अनुभव आहेत, परंतु श्रींनीं प्रेरणा केल्याखेरीज ते लिहून पाठवायचे नाहींत असा विचार होता, परंतु आज त्यांतला फक्त एक लिहून पाठवितें.

१९४२ सालीं फेब्रुवारी व मार्च ह्या २ महिन्यांत जपानी लोकांनीं बर्मामध्यें धुमाकूळ माजविला होता. त्या लढाईंत आमचा मुलगा मोठ्या धोक्याच्या व जबाबदारीच्या कामावर ज्या दिवशीं रंगून पडलें त्याच दिवशीं आपल्या तुकडीसह पोहोंचला.

त्याची तुकडी ज्याअर्थीं मद्रासहून 'कोठेंतरी ॲक्टिव्ह सर्व्हिसला गेली त्याअर्थीं ब्रह्मदेश, असावा असा आमचा तर्क होता.

शत्रूशीं सामना देतांना ठिकठिकाणीं बाबांनीं त्याला इतकें सांभाळलें कीं, त्यांचें जर संरक्षण नसतें तर मुलगा सुखरूप आला नसता.

त्याचें पत्र वगैरे कांहींच खुशालीचा मार्ग नसतां, इतकेंच नव्हे तर त्याच्या तुकडीच्या सुरक्षिततेबद्दल शंका प्रदर्शित केल्या जात होत्या, माझा सारा भार परमेश्वर व श्रीसाईबाबा, तेव्हां अत्यंत काळजीच्या परिस्थितींत निरनिराळे तर्कवितर्क करण्यापेक्षां नामस्मरणाचा स्वतःशींच ध्यास घेऊन स्वस्थ राहिलें. परंतु दिवसेंदिवस तिकडून येणाऱ्या बातम्यावरून मनाचा धीर सुटत चालला. असेंच एका पहांटे सवईप्रमाणें पलंगावर पडल्या पडल्या अर्धवट झोपेंत नामस्मरण चालू होतें, तेव्हां स्वप्न पडलें कीं, बैलाच्या घुंगुरांचा आवाज करीत एक अत्यंत नवी कोरी गाडी, बैल सफेत व पुष्ट, तसेच सर्व दांड्या रंगीत व घुंगुराचा नाद तरी किती मनोहर ! मी ओटीवर जाऊन पाहूं लागलें तर गाडींत काय तेजस्वी उजेड पडला होता ! आपण देवाच्या फोटोमध्यें, त्याच्या तोंडाभोंवती पाहतो ना, अगदीं तस्साच.

थोड्या वेळांत गाडी आमच्याच घरासमोर उभी राहून त्यांतून कोणीतरी उतरलें, पहातें तर एक कफनीवाला अत्यंत तेजस्वी बोवा ! तो आमच्या ओटीवर आला. कां कोण जाणें, मी हात पुढें केला त्यावर, वचन देतांना हात मारतात तसा त्यानें मारला व एकवार माझ्या हातावर, वरपासून हात

फिरविला. मला एकप्रकारचा विलक्षण आनंद झाला. मी त्या बोवाच्या तोंडाकडे पाहिलें व एकदम म्हणालें 'कोण साई महाराज! मी आपल्याला ओळखलेंच नव्हतें.' त्याबरोबर ते हंसले; व मी जागी झालें. माझ्या अंगावर आपोआपच आनंदानें रोमांच उठलें होतें. जागेपणीं पडलेल्या स्वप्नाचा विचार मनांत येऊन, मुलाची खबर कधीं आणि काय येते याचा कांहींच निर्णय होईना. परंतु त्याच दिवशीं, ऐन लढाईच्या भागांतून गांवाच्या नांवासह 'सुखरूप आहे. काळजी करूं नका' अशा त्याच्या हातच्या दोन ओळींचें पत्र.

देवधर्म, साधुसंत वगैरेंच्या बाबती भावनाप्रधान न बनतां नुसता विचार करायचा अशा पद्धतीचे आमचे विचार असतांनासुद्धां हें असें घडलें हा मनाचा खेळ कीं अनुभव तें आपणच ठरवा व वाटल्यास छापा. माझी हरकत नाहीं. परंतु नांव नको.

---

# शिर्डी वृत्त

## जून १९४३

गांवोगावचे भक्तांची श्रीचे दर्शनास ये जा चालूच होती. त्यांतले त्यांत मद्रदेशीयांची विशेष.

**देणगी:**—श्री. वि. आ. वैद्य, अंधेरी–चांदीचें फुलपात्र. सावित्रीबाई हैदराबादकर, साकोरी–रेशमी हिरवा शालू. एम्. व्ही. लोकरे, बेळगांव–हिरवा गलेफ व व. गो. मुसळे, अडोनी–निळ्याखड्याची गिनीगोल्डची आंगठी.

**ध. कृ.:**—अभिषेक, आर्चन, नैवेद्य, ब्राह्मण सुवाशिण भोजन वगैरे नेहमींप्रमाणें चालू होती.

**अन्नदान:**—ता. ८।६।४३ मंगळवार रोजीं श्री. नारायणाश्रम स्वामी (ठोसर) यांचे श्री तुलसीरामायण, नाथभागवत, दत्तप्रबोध व साईसच्चरित या चतुर्वेद रूपी ग्रंथांचें दीक्षित वाड्यांत झालेलें पारायण सप्ताहसमाप्ती प्रीत्यर्थ श्री. नानासाहेब खारकर, संस्थानचे चिटणीस यांनीं श्रीस नैवेद्य करून ब्राह्मण भोजन व सप्तापठणास हजर राहात असलेले भाविक ग्रामस्थ मंडळीस व संस्थान नोकर, सेवेकरी व ते दिवशीं शिरडींत श्रीचे दर्शनास हजर असलेले बाहेरचे पाहुणे मंडळीस लाडवाचें प्रसादभोजन दिलें. दुसरें दिवशीं ते व श्री. सांबारे सं. चे खजिनदार जे या सप्ताहाकरितां मुद्दाम शिरडींत राहिले होते ते आपले घरीं मुंबई बाजूस परत गेले व तेच दिवशीं त्यांचेबरोबर श्री. नारायणस्वामीही आपले मुरलीधर मठ मुं. वांईस रवाना झाले.

**कीर्तन:**—सं. गवई यांचीं दोन्ही एकादशीस दोन व एक ह. भ. प भास्करबुवा गुरव मलकापूरकर (श्री. गाडगेबुवांचे शिष्य) यांचें संस्थानकडून एक रुपया व नारळ श्रीचा प्रसाद देऊन यांची संभावना करण्यांत आली.

**नवल विशेषः**—रॉकेलचे अभावी गॅसकंदील बंद ठेवून समयांवरच भागविणें प्राप्त झालेलें आहे. फक्त गुरुवारचे पालखीचे वेळीं तासभर एकच गॅस-कंदील लावणेंत येतो.

**हवापाणीः**—पाऊस बराच असून लेंडी नाल्यास पांचसहा पूर आल्यामुळें लेंडी बागेची धूप झाली आहे. रोगराई नाहीं.

## जुलै १९४३

गांवोगांवचे भक्तांची ये जा सुरूच होती व मद्रदेशीयांची विशेष.

**देणगीः**—श्री. र. चि. मर्चंट, अडोनी–जरीकाठी शाल. एस्. बी. गव्हाणकर, मुंबई–जरीकाठी रुमाल व उपरणें. दा. वि. सांबारे, विलेपार्ले–जरीकाठी शेला (पांमरी हिरवी); चि. मा. जव्हेरी, मुंबई–कापडतागा ४० वारी. सौ. अनुसूयाबाई स. चौधरी, पुणें–खादीची शाल. शेठ भरुचा, साकोरी–२ पितळी निरांजनें व सौ. शांताबाई सु. माने, पुणें–शुभ्रकाठीं उपरणें.

**ध. कृ.:**—नेहमींप्रमाणें व श्रीगुरुपौर्णिमा उत्सवांत विशेष.

**कीर्तनः**—सं. गवई यांचीं–दोन एकादशा व श्री. नामदेव व सांवतामाळी पु. तिथि प्रत्येकीं एक व गु. पौ. उत्सवांत तीन.

**नवल विशेष :**—श्रीचे द्वारकामाईत सं. चे. ऑ. चि. यांनीं आपले चिरंजीव (श्री. गोपाळ श्रीधर खारकर) यांचे हस्ते श्रीसाई सत्यव्रत पूजा करवून तत्प्रीत्यर्थ श्रीस नैवेद्य, ब्राह्मण सुवाशिण भोजन व प्रसाद, ब्राह्मणांस दक्षणा व गोरगरीबांस चिल्लर वाटली. या पूजेचे आरतीचे वेळीं भक्तांस श्रीचे हयातींतील तेथील नित्यचे आरतीची जाणीव झाली.

आषाढी (महा एकादशीस)—श्रीचे समाधीस थाटानें मंगलस्नान, रात्रौ पालखीची मिरवणूक झाली.

श्री गु. पौ. उत्सव अहवाल निराळा दिला आहेच. या उत्सवांत संस्थानचे भ. मं. ची २२ वी वार्षिक सभा व सं. क. ची सभा अशा दोन सभा दीक्षित वाड्यांत झाल्या.

श्री. श्री. ना. खारकर, सं. चि. यांना त्यांचे–बाबांचे आज्ञेप्रमाणेंच–मागणीवरून कमिटीनें चिटणिसीचे कामांतून मुक्त केलें व त्यांचे जागीं श्री. शंकर दत्तात्रय बलवल्ली, मु. वांकोला, सांताक्रुझ, मुं. २३ यांची नेमणूक केली.

**हवापाणी**—उत्तम.

554

———

श्रीसाईबाबा प्रसन्न

# श्रीरामनवमी उत्सव शके १८६५ सन १९४३

## ( उत्सव अहवालाचा तपशील )

॥ श्री शंकर ॥

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणी श्रीसाईबाबा महाराज संस्थान शिरडी, तालुका कोपरगांव, जि. अहमदनगर यांच्या शके १८६५ च्या श्रीरामनवमी उत्सवाचें इतिवृत्तः

सदरचे उत्सवास चैत्र शु॥ अष्टमी ता. १३–४–४३ मंगळवार रोजीं आरंभ होऊन चैत्र शु॥ द्वादशी १७।४।४३ शनिवार रोजीं गोपाळकाला होऊन उत्सव समाप्त झाला.

या उत्सवास मोंगलाई, महाराष्ट्र व मद्रास इलाखा या प्रांतांतील गांवोगांवचे लोक आले होते.

उत्सवाचे कार्यक्रम उत्तम प्रकारें पार पडले. पोलीसबंदोबस्त योग्य असल्यामुळें चोरी मारामारी वगैरे झाली नाहीं. पिण्याचे पाण्यांत पोटॅशियम परमॅंगनेट टाकल्या-मुळें रोगराई होण्याची भीति राहिली नाहीं. चालू सालीं मे. कलेक्टरसाहेब बहादूर जि. अहमदनगर यांनीं उत्सवाप्रीत्यर्थ घासलेट व साखऱ्या यांची थोडीसी सवलत दिल्यामुळें उत्सव उत्तम प्रकारें पार पडला.

श्रीमहाराजांचे समाधीस स्नान घालण्याकरितां नवमीचे दिवशीं सुमारें २०० श्रीगंगेच्या कावडी आल्या होत्या. त्यांत सर्व जातीचे लोक होते.

यात्रेकरतां नानाप्रकारचीं दुकानें आलीं होतीं. नवमीचे दिवशी रात्रीं शोभेचें दारुकाम झालें. रथाची व काठयांची मिरवणूक नेहमींप्रमाणें निघाली. रात्रीं बाराचे सुमारास मुसलमानांचा संदल मिरवीत आला. दशमीचे दिवशीं कुस्त्यांचा हगामा श्री. तात्या गणपत पाटील कोते यांचे देखरेखीखालीं उत्तम प्रकारें पार पडला. या कामीं कमेटीनें १५० रु. दिल्यामुळें हगाम्यास शोभा आली.

कै. श्रीमंत गोपाळ मुकुंद ऊर्फ बापूसाहेब बूटी यांनीं श्री महाराजांचे समाधीस एक लाख रुपयाच्या इमारतीचा तळमजला दिला व आपलें नांव इह परलोकी अज-रामर केलें. त्याप्रीत्यर्थ त्यांचे वंशजास मानाचें पान म्हणून एखादें समाधीवरील वस्त्र प्रसाद म्हणून दरसाल दिल्यास त्यांच्या मनास आनंद होऊन कमेटीनें त्याचा योग्य सत्कार केला असें होईल. तरी कमेटीनें वाटल्यास याचा विचार करावा.

या उत्सवांत ज्यांनीं येथें येऊन प्रत्यक्ष भाग घेतला किंवा द्रव्यद्वारां मदत केली त्या सर्व लोकांचे, त्यांच्या मानमरातबाचे, त्यांच्या लेंकराबाळांचें व आराग्याचें संरक्षण श्रीसाईमहाराज करोत अशी त्यांचे चरणापाशीं नम्र विनंती आहे.

सर्व अपराधांची क्षमा करून श्रीसाईमहाराजांनीं सदैव कृपादृष्टीनीं मज पामराकडे पहावें अशी प्रार्थना करून लेख पुरा करतों.

सकल संताचा चरणरज

सही–दास गणू

## उत्सवाचे जमाखर्चाचा अहवाल

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| ९५९–३–० | संस्थानमार्फत. | २३९–९–६ | संस्थानमार्फत |
| १४९२–७–० | दासगणूमार्फत. | २१९६–७–९ | दासगणूमार्फत |
| २४५१–१०–० | | २४३६–१–३ | |
| १५०––०–० | हगाम्याकरतां संस्थानमार्फत. | १५०–०–० | श्री. तात्या पाटील मार्फत ( हगाम्याकडे ) |
| २६०१–१०–० | | २५८६–१–३ | |

१५–८–९

श्री. ना. खारकर

ऑ. चिटणीस, ता. १७–७–४३

---

## श्रीगुरुपौर्णिमा उत्सव अहवाल 555

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज, मु. शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर येथें श्रीचे मंदिरांत श्रीगुरुपौर्णिमा उत्सव आषाढ शु०॥१५ शके १८६५ शनिवार ता. १७।७।४३ रोजीं संस्थानमार्फत साजरा झाला.

उत्सवास प्रारंभ ता. १६।७।४३ रोजीं झाला. गांवागांवचे त्यांतल्यात्यांत मद्रास प्रांतांतील विशेष भक्त उत्सवास आले होते. या दिवशीं नियमित कार्यक्रमा-व्यतिरिक्त दोन प्रहरीं संस्थान गवई यांचें कीर्तन झालें. रात्रौ रथाची मिरवणूक झाली. मंडळीची भोजन–चहा–फराळ वगैरेंची व्यवस्था कै. दीक्षित यांचे वाड्यांत ठेवण्यांत आली होती.

ता. १७–७–४३ शनिवार रोजीं प्रातःकाळीं अभिषेक–अर्चन, नंतर श्रींचे समाधीस मंगलस्नान–पूजा, वस्त्रार्पण–फुलांचे शेरे, हार–तुरे, अत्तर–गुलाब, फळें, पेढे–श्रीफळ वगैरे बऱ्याच वस्तू भक्तांनीं अर्पण केल्यानंतर पुणें येथील श्रीसाईदास मंडळाचा, संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. श्री. माधवराव जोशी यांचें गायन, श्री. राजाराम देशपांडे यांचें हर्मोनियम वादन व शंकरराव यांचें सनई वादन झालें. अहमदनगरचे सबजज्ज श्री. व्ही. आर. मंजेश्वर यांचे मुलीने गायनाचा कार्यक्रम झाला. नंतर श्रीस महा नैवेद्य, आरती, प्रार्थना, अष्टक, स्तोत्र, प्रदक्षिणा वगैरे झाल्यावर भोजनसमारंभ झाला. सायंकाळीं संस्थानचे सन्मानीय ट्रस्टी रावसाहेब यशवंत जना-र्दन गाळवणकर यांचे सद्गुरु भक्ती या विषयावर सुश्राव्य कीर्तन झालें. रात्रौ श्रींच्या पालखीची मिरवणूक झाली. नंतर श्रीयुत कृष्णराव चोणकर ( गंधर्व नाटक मंडळींतील माजीनट ) यांचें गायन झालें. व श्रीसाईदास मंडळ पुणें–यांचाही गायन–भजन-सनई वादन हार्मोनियम वादन–फ्ल्यूट वादन, असा कार्यक्रम झाला. नंतर ऑ. दु. चि. द. दा. उर्फ नानासाहेब रासने, पुणें यांनीं ( साईदास मंडळ, पुणें ) यांतील सर्व गुणी जनांचे व श्री कृष्णराव चोणकर, मुंबई यांची सर्वांस ओळख करून दिली व त्यांचे आभार मानिले. नंतर चहापान होऊन कार्यक्रम आटोपला.

ता. १८–७–४३ रविवार रोजीं सकाळीं संस्थान तर्फे यांचे गोपाळ काला कीर्तन ( दही–हंडिप्रसाद ) वगैरे झालेनंतर श्रींची पूजा, आरती, महानैवेद्य झालें. नंतर भोजनसमारंभ झाला. या दिवशीं पान बरेंच असल्यानें श्रीमंदिर व दीक्षितवाडा या दोन्ही ठिकाणीं भोजनास बसण्याची व्यवस्था केली होती. या दिवशीं भोजन–प्रसादास गांवांतील बरीच मंडळी होती. वाढण्याची सेवा अहमदनगरचे श्री. मंजेश्वर सबजजसाहेब, श्री. चौगुले सबजजसाहेब–पारनेर, श्री. व्ही. आर. रंग-नाथन्, लोकल ऑडीट ऑफीसर अहमदनगर, श्री. शंकरराव वळवली, श्री. अनंता-चार्य, स्टेशनमास्तर, मु. चितळी, वगैरे बड्या मंडळींनीं हातीं घेऊन उत्तम रीतीनें पार पाडली. दोन प्रहरीं प्रथम शिरडी संस्थानच्या भक्तमंडळींची २२वी वार्षिक सभा दीक्षित वाड्यांत भरली व नंतर कमिटीची सभा झाली. येणेप्रमाणें कार्यक्रम होऊन उत्सव समाप्त झाला.

उत्सवांत तीन दिवसांत भोजनपात्र सुमारें २ हजार झालें. शेवटचे दिवशीं आंधळे, पांगळे, महार, मांग, भिल्ल, वडार या सर्व गोरगरिबांस श्रीमंदिराचे पुढील पटांगणांत बुंदीचे लाडवांचें ( भंडारा भोजन ) देण्यांत आलें.

यंदाचे उत्सवास जास्त मंडळी आली होती व चालू युद्धपरिस्थितीमुळें जरी महर्घता व दुर्भिक्ष होतें तरी श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांनीं कोणत्याच गोष्टीची उणीव भासूं दिली नाहीं व आपला उत्सव त्यांनीं उत्तम प्रकारें करून घेतला.

श्रीच्या मंदिरांतील उत्सव-व्यवस्था, प्रसाद देणे-घेणेची व इतर कार्यक्रम आणि त्यावरील देखरेख व व्यवस्था उत्तम प्रकारें श्री. र. भा. पुरंदरे. व. श्री. द. दा. रासने, पुणें यांनीं ठेविली.

श्रीच्या उत्सवांतील भोजनसमारंभाची व्यवस्था श्री. तात्याजी गणपतराव कोते पाटील, शिरडी, रावसाहेब यशवंत जनार्दन गाळवणकर, वांद्रा, श्री. श्री. ना. ऊर्फ नानासाहेब खारकर, ऑ. चि. व श्री. शंकरराव दत्ताराम वलवली यांनीं उत्तम-प्रकारें ठेवून पाहुणे मंडळीचें यथोचित आदरातिथ्य केलें.

## उत्सव जमाखर्चाचा अहवाल.

| जमा. | | खर्च. | |
|---|---|---|---|
| १९६—९—६ | पेट्या वसुली. | ११०१—६—९ | कच्चा खर्च. [अंदाजी कोठी स्टॉकमधून वापरले गेले सामानाचे किंमतीसुद्धां.] |
| २०४९—१५—९ | वर्गणी वसुली. | | |
| १२५—०—० | विशिष्ट अलाहिदा वसुली (चि. मार्फत). | | |
| २३७१—९—३ | | ११०१—६—९ | |

२७०—२—६ अंदाजी शिल्लक संस्थानकडे जमेपोटीं जमा झालेली आहे.

श्री. ना. खारकर,
ऑ. चि.
१७—७—४३.

—उत्सवांत रविवार ता. १० आक्टोबर रोजीं श्रीचे जुने कपडे प्रसाद म्हणून भक्तांस विक्रींत देण्यांत येतील. याचा फायदा फक्त हजर असलेल्या भक्तांस घेतां येईल. कोणासहि बाहेरगांवीं यांतील कपडा घेऊन पाठविण्याची व्यवस्था संस्थेमार्फत होणार नाहीं.

## श्री साईबाबा

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमेटीची सभा शिर्डी येथें दिक्षीत वाड्यांत रविवार ता. १८–७–४३ रोजीं दुपारीं साडेपांच वाजतां भरली होती त्या सभेचें टिपणः–

### हजर सभासद

| | |
|---|---|
| १ रा. बा. मो. वि. प्रधान | ६ श्री. व. ना. गोरक्षर |
| २ श्री. ना. अ. सावंत | ७ श्री. शं. द. वलवली |
| ३ श्री. द. दा. रासने | ८ श्री. र. भा. पुरंदरे |
| ४ श्री. दा. वि. सांबारे | ९ श्री. ता. ग. पाटीलकोते |
| ५ रा. सा. य. ज. गाळवणकर | १० श्री. श्री. ना. खारकर. |

ठ. नं. १. गेले ता. २७-६-४३ चे सभेचें टिपण सर्वानुमतें मंजूर असल्याचें ठरलें व त्यावर अध्यक्षांची सही झाली.

ठ. नं. २. सरकारचे वॉर फंडास संस्थानमार्फत रु. १०० ची देणगी देण्याचें सर्वानुमतें ठरलें.

सू. मांडणार, रा. सा. गाळवणकर, अनु. देणार, श्री. सावंत

ठ. नं. ३. संस्थानमध्यें असलेले दोन चोपदार यांना हल्लीं देत असलेली वार्षिक देणगी प्रत्येकीं रुपये ४० ची आहे ती ता. १–७–४३ पासून प्रत्येकी रु. ४८ची करावी व ते पैसे सहासहा महिन्यांनीं न देतां प्रत्येक महिन्यास प्रत्येकी रुपये ४ प्रमाणें द्यावे असें सर्वानुमतें ठरलें.

ठ. नं. ४. संस्थानचे सन्माननीय ऑडिटर मेसर्स जे. परुळेकर आणि कंपनी यांस सन १९४२ सालचा हिशेब तपासून दिल्याबद्दल रु. १०० ( शंभर फक्त ) ऑनरेरियम (देणगी) द्यावेत असें सर्वानुमतें ठरलें.

ठ. नं. ५. बाळा शिंपी याच्या ता. १५-४-४३ च्या अर्जाचा विचार केला व त्या बाबतींत स्थानिक ट्रस्टी रा. रा. तात्याबा कोते पाटील यांचें म्हणणें ऐकून घेऊन सर्वानुमतें असें ठरलें कीं, त्याचा अर्ज नामंजूर करावा.

